# बीड जिल्हा पोलीस दल,
# सायबर पोलीस बीड.

## :: महत्वपुर्ण सुचना ::

**अफवांपासून सावधान ! अफवा पसरविणारे अथवा खोटी न्युज प्रसारीत करणाऱ्यांवर होणार कठोर दंडात्मक कारवाई.**

*मागील काळात सोशल मिडियाच्या वेगवेगळया माध्यमांचा वापर करुन अश्या अफवा व भ्रामक पोस्ट पसरवल्या जात आहेत की, ज्यामुळे दोन भिन्न समाजामध्ये व वर्गामध्ये वैमनस्य वाढेल व एकमेकांप्रती व्देषभावना निर्माण होईल.*

***बीड जिल्हयातील सर्व नागरीकांना या व्दारे आवाहन करण्यात येते की, कृपया अश्या अफवा पसरविण्याचे तुम्ही प्रचार-प्रसार माध्यम बनु नका.***

- कोणत्याही प्रकारचे सोशल मिडीयाचे माध्यम वापरून सामाजिक, राजकीय किंवा इतर अफवा पसरवू नका, पोस्ट करू नका, अथवा शेअर करु नका.
- तुम्हाला सोशल मिडियावर काही अफवा अथवा भडकावू पोस्ट दिसल्यास त्यावर विश्वास ठेवण्याआधी सत्यता पडताळन्याकरीता नजिकच्या पोलीसांकडे चौकशी करा अथवा सायबर पोलीसांशी संपक करा
- आपले गांव, मोहल्ला तथा आसपासच्या परिसरात शांतता व सौहार्दपुर्व वातावरण राहण्यासाठी सदैव प्रयत्नशील रहा.
- राष्ट्रीय एकता, अखंडता व आपसातील सौहार्दता यांना बाधा पोहचेल अशा अफवा पसरविणे हा गंभीर अपराध आहे व त्यात तात्काळ अटकेचे प्रावधान आहे.
- भिन्न धर्म, जाती, वर्ग यांच्यामध्ये असौहार्दता किंवा शत्रुता, घृणा, वैमनस्यता बाबतचे संदेश सोशल मिडिया अथवा अन्य मार्गाने प्रसारित करणे हो दंडनिय अपराध आहे.

**नमुद अपराधांकरीता खालील कलमांनुसार दंडाचे प्रावधान आहे.**

1) भा.न्या.सं. कलम 196, 197, 299, 356(2), 353 अन्वये शिक्षा व दंड अथवा दोन्ही
2) IT Act कलम 66 अन्वये तीन वर्षापर्यंत शिक्षा व पाच लाख रुपये दंड अथवा दोन्ही, व अपराध पुन्हा केल्यास पाच वर्षापर्यंत शिक्षा व दहा लाख रुपये दंड अथवा दोन्ही.

**अंततः - सोशल मिडियाचा गैरवापर करु नका.**

**बीड जिल्हयातील सर्व नागरिकांना अवाहन करण्यात येते कि, कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्यास पोलीस प्रशासनास सहकार्य करा.**

| | | |
|---|---|---|
| अविनाश बारगळ | सचिन पांडकर | देविदास गात |
| **पोलीस अधीक्षक बीड.** | **अपर पोलीस अधीक्षक बीड.** | **पोनि. सायबर, पोस्टे बीड.** |